


Tel-022-26508381
Email-
dcpzone8.mum@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-८,मुंबई
यांचे कार्यालय.
बीकेसी पोलीसठाणे पहिला माळा,बीकेसी
बांद्रा,(पु), मुंबई - ४०० ०५१

---

# परिमंडळ ८, मुंबई

# प्रे स नो ट

## परिमंडळ ८ कडुन एकुण ८४,४३,४७९/- रू किंमतीचा एकुण २८७ मुद्देमाल मुळ मालक यांना परत केल्याबाबत

दिनांक ०४/०४/२०२६ रोजी परिमंडळ - ०८ मधील बीकेसी, खेरवाडी, निर्मलनगर, वाकोला, विलपार्ले, सहार व विमानतळ या सर्व सात पोलीस ठाणे कडुन मालमत्तेच्या गुन्हयातील आरोपीकडुन हस्तगत मुद्देमाल, तसेच गहाळ झालेले हस्तगत मोबाईल परत करण्याकरीता सामुहिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

परिमंडळ ८ मधील पोलीस ठाणेंकडुन सोनसाखळी चोरी, जबरी चोरी, चोरी, मोटार वाहन चोरी इ. मालमत्ता विषयी गुन्हयांमधील मौल्यवान दागिने, दोन चाकी व चारकामी मो. वाहने, रोख रक्कम इ. तसेच गहाळ झालेले मोबाईलपैकी CEIR प्रणालीचा वापर करून तांत्रिक तपास करून हस्तगत केलेल एकुण २७७ मोबाईल अशा स्वरूपाची एकुण ८४,४३,४७९ /- रू (चौऱ्याऐंशी लाख त्रेचाळीस हजार चारशे एकोणऐंशी रूपये) किंमतीचा एकुण २८७ नग मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता.

दिनांक ०४/०४/२०२६ रोजी पासयदान हॉल, बिकेसी पोलीस ठाणे पहिला मजला, बिकेसी, मुंबई येथे श्री मनीष कलवानिया, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -८, मुंबई यांच्या हस्ते व पोलीस ठाणे पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या उपस्थितीत उपरोक्त प्रमाणे एकुण ८४,४३,४७९ /- रू किंमतीची मालमत्ता मुळ मालक यांना परत करण्यात आली.

सदर कार्यक्रमामध्ये गुन्हयातील मालमत्ता/ गहाळ मालमत्ता पोलीसांकडुन परत मिळाल्याने लोकांनी आनंद व्यक्त केला व पोलसांचे आभार मानले.